# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३.

परिपत्रक क्र. नाविमं/लेखा/नोंदणी शुल्क—शिक्षण संक्रमण/२०२४—२५/ ७१७, दिनांक : १८/०६/२०२४

**विषय: नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत...**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळा/महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, सन २०२४—२५ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क खाली नमुद केलेल्या दराने इ. १०वी व इ. १२वी च्या नियमित विद्यार्थी संख्येप्रमाणे नोंदणी शुल्क व शाळा/महाविद्यालयांनी शिक्षण संक्रमण शुल्क रु. ५००/— प्रमाणे दि. १०/०८/२०२४ पुर्वी विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाद्वारे जमा करण्यात यावेत.

| तपशिल | नोंदणी शुल्क | | शिक्षण संक्रमण शुल्क | |
|---|---|---|---|---|
| | इ. १० वी | इ. १२ वी | इ. १० वी | इ. १२ वी |
| १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता | रु. १०००/— | रु. १०००/— | रु. ५००/— | रु. ५००/— |
| त्यापुढील प्रत्येक १००विद्यार्थ्यांसाठी | रु. २००/— | रु. ४००/— | | |

उपरोक्त दराप्रमाणे नोंदणी शुल्क दिनांक **१०/०८/२०२३** पूर्वी विभागीय मंडळाकडे जमा न केल्यास निर्धारित नोंदणी शुल्काव्यतिरिक्त खालील प्रमाणे दंडात्मक शुल्क भरावे लागेल, याची नोंद शाळा/महाविद्यालयांनी घ्यावी.

| अ. क्र. | तपशिल | दंडाची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | इ. १०वी | इ. १२वी |
| १ | दि.११/०८/२०२४ ते ते दि.३१/०८/२०२४ | रु.२००/— | रु.२००/— |
| २ | दि.०१/०९/२०२४ ते दि.३०/०९/२०२४ | रु.३००/— | रु.३००/— |
| ३ | दि.०१/१०/२०२४ नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु.५००/— | रु.५००/— |
| | एकूण दंडाची रक्कम | रु.१,०००/— | रु.१,०००/— |

**विशेष सूचना —**

१. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे **बँक ऑफ इंडियाच्या चलनाद्वारेच** स्वतंत्ररित्या जमा करण्यात यावे.
२. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काचे चलन **बुधवार, दि. १४/०८/२०२४ पर्यंत मंडळ कार्यालयात भरलेले चलन पोस्टाने किंवा हस्तपोच जमा करावे.**
३. चलनातील सर्व माहिती परिपुर्ण भरून चलनावर **विद्यार्थी संख्येची** नोंद करणे आवश्यक आहे.
४. **दिनांक १०/०८/२०२४** नंतर नोंदणी शुल्क भरल्यास नोंदणी शुल्क दंडाची रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही एकत्रित शुल्क भरणे आवश्यक राहील.
५. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत पाठविलेल्या नमुन्यातील पत्रावर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक, इ.१०वी/इ.१२वी नियमित विद्यार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकुण रक्कम व बँकेचे नाव इ. बाबी नमुद केलेल्या असाव्यात.
६. ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१०वी/इ.१२वी साठी स्वतंत्र रु.५००/— शिक्षण संक्रमण शुल्क भरणे आवश्यक आहे.
७. वर्गणीचा कालावधी माहे जुलै २०२४ ते जून २०२५ असा राहील.
८. इ.१० वी/इ.१२ वी साठी फेब्रुवारी—मार्च २०२५ च्या परीक्षेकरीता प्राप्त होणारे नोंदणी शुल्क हे आपण भरलेल्या विद्यार्थी संख्या व मंडळाकडे प्राप्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रांची संख्या यांची पडताळणी करण्यात येणार आहे. तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबींची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी.
९. तांत्रिक कारणास्तव चलनाद्वारे शुल्क जमा करता न आल्यास मंडळ कार्यालयात रोखीने जमा करण्यात यावे.
१०. या व्यतिरिक्त ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षण संक्रमणाचे जादा अंक पाहिजे असल्यास तसेच वैयक्तिक वर्गणीदार व इतर संस्था यांना आपली वर्गणी **सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न. ८३२—ए फायनल प्लॉट नं. १७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टीटयुटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे ४११००४.** या नावे डिमांड ड्राफ्टने पाठवावी.

वरील सर्व सूचनांची नोंद घेवून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाने शुल्क मंडळाकडे मागील वर्षाप्रमाणे पोष्टाने किंवा हस्तपोहोच पाठवावे. यासंबंधीचे चलन/डी.डी. हे **दि. १०/०८/२०२४** पुर्वी काढलेले असावे. सदर दिनांकानंतर काढण्यात येणारे चलन/डी.डी. दंडात्मक रक्कमेसह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. **अन्यथा या संदर्भात कोणतेही स्मरणपत्र न पाठविता मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

(एम एस देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मंडळ मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हे

# नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलना सोबत
**इ. १० वी /इ. १२ वी** करीता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | | दुरध्वनी / भ्रमणध्वनी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क. म. सांकेतांक | J | | | | | | | | | | | | | | | | | | |

जा.क्र./---------------
दिनांक :--------------

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक—४२२ ००३.

विषय :—नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....
संदर्भ :—आपले परिपत्रक क्र.नाविमं/लेखा/नों.शु./२०२४—२५/७१७ दिनांकः १८/०६/२०२४.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून इ. १० वी व इ. १२ वी सन २०२४—२५ या शैक्षणिक वर्षाचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन/डि.डि. या सोबत पाठविण्यात येत असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

नोंदणी शुल्क (इ. १० वी /इ. १२ वी)
सन २०२४—२०२५ करीता नोंदणी शुल्काचा तपशिल

| नियमित विद्यार्थी संख्या | बॅंकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | १००० |

---

शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ. १० वी/इ. १२ वी)
सन २०२४—२५ करीता शिक्षण संक्रमण अंक शुल्काचा तपशिल

| नियमित विद्यार्थी संख्या | बॅंकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | ५००/— |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टिप:—
१. इ. १० वी/इ. १२ वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बॅंक ऑफ इंडियाचे चलन/डि.डि. वेगवेगळे पाठवावे.
२. इ. १०वी/इ. १२वी स्वतंत्र प्रपत्र पाठविणे आवश्यक आहे.
३. इ. १०वी/इ. १२वी नोंदणी शुल्काचे चलन/डि.डि.स्वतंत्र पाठवावेत.